RNI No. MAHBIL/2012/47985
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १३, अंक - १० ] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट २९ ते सप्टेंबर ४, २०२४ / भाद्र ७ - १३, शके १९४६ [ पृष्ठे ०५

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

### आदेश

क्रमांक नवि/निवडणूक/कावि-२७३/२०२४.— महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १९ पोटकलम *(१)* व मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्रमांक एमएनसी-११/०१/सीआर-१३/डी-१०, दिनांक १७ ऑगस्ट २००१ अन्वये प्राप्त केलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. राजा दयानिधी, जिल्हाधिकारी, सांगली या प्रकटनाद्वारे असे जाहीर करतो की, खानापूर नगर पंचायतीच्या पोट निवडणुकीमध्ये खालील उमेदवार त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या प्रवर्गातून महाराष्ट्र नगर परिषद व नगर पंचायत निवडणूक नियम १९६६ चे नियम ५९ अन्वये निवडून आलेले आहेत.

### अनुसूची

| अ.नं. | निवडून आलेल्या सदस्याचे नाव | प्रभाग क्रमांक | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | माळी लता बाळासो | १७ | सर्वसाधारण महिला |

**डॉ. राजा दयानिधी** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, सांगली.

सांगली, १४ ऑगस्ट २०२४.

---

### BY COLLECTOR

### ORDER

No. NP/Election/RR-273/2024.– In exercise of the powers conferred on me by the State Election Commissioner, Maharashtra, Mumbai *vide* his Order No. MNC/11/01/CR-13/D-11, dated 17th August 2001 and the provisions contained in the sub-section *(1)* of Section 19 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965. I, Dr. Raja Dayanidhi, Collector of Sangli, hereby publish the name of the candidate who have been declared elected under Rule 59 of the Maharashtra Municipal Councils and Nagar Panchayat Election Rules, 1966 as the Councillor of Khanapur Nagar Panchayat from the ward shown against her name in the Bye-Election of Khanapur Nagar Panchayat.

**Schedule**

| Sr. No. | Name of Candidate | Ward No. | Category |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | Mali Lata Balaso | 17 | General Woman |

**DR. RAJA DAYANIDHI** (I.A.S.),
Collector, Sangli.

Sangli, 14th August 2024.

---

**आदेश**

क्रमांक नवि/निवडणूक/कावि-२७२/२०२४.— महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १९ पोटकलम *(१)* व मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्रमांक एमएनसी-११/०१/सीआर-१३/डी-१०, दिनांक १७ ऑगस्ट २००१ अन्वये प्राप्त केलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. राजा दयानिधी, जिल्हाधिकारी, सांगली या प्रकटनाद्वारे असे जाहीर करतो की, कवठेमंहाकाळ नगर पंचायतीच्या पोट निवडणुकीमध्ये खालील उमेदवार त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या प्रवर्गातून महाराष्ट्र नगर परिषद व नगर पंचायत निवडणूक नियम १९६६ चे नियम २४ *(२)* अन्वये निवडून आलेले आहेत.

**अनुसूची**

| अ.नं. | निवडून आलेल्या सदस्याचे नाव | प्रभाग क्रमांक | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | अनुराधा गणपती सगरे | ०७ | सर्वसाधारण |

**डॉ. राजा दयानिधी** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, सांगली.

सांगली, १४ ऑगस्ट २०२४.

---

**ORDER**

No. NP/Election/RR-272/2024.– In exercise of the powers conferred on me by the State Election Commissioner, Maharashtra Mumbai *vide* his Order No. MNC/11/01/CR-13/D-11, dated 17th August 2001 and the provisions contained in the sub-section *(1)* of Section 19 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965. I, Dr. Raja Dayanidhi, Collector of Sangli, hereby publish the name of the candidate who have been declared elected under Rule, 24 *(2)* of the Maharashtra Municipal Councils and Nagar Panchayat Election Rules, 1966 as the Councillor of Kavathemahankal Nagar Panchayat from the ward shown against her name in the Bye-Election of Kavathemahankal Nagar Panchayat.

**Schedule**

| Sr. No. | Name of Candidate | Ward No. | Category |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | Anuradha Ganapati Sagare | 07 | General |

**DR. RAJA DAYANIDHI** (I.A.S.),
Collector, Sangli.

Sangli, 14th August 2024.

---

## आदेश

क्रमांक कार्या. ११/न.पा./सं.क. ७/पोटनिवडणूक/एसआर-२०/२०२४.— महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १९ *(१)* मधील तरतुदीन्वये व मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/न.प.-२०२२/प्र.क्र. ६/का-६, दिनांक १२ जुलै २०२४ अन्वये प्राप्त केलेल्या अधिकारान्वये मी, अमोल येडगे, जिल्हाधिकारी, कोल्हापूर या प्रकटनाद्वारे असे प्रसिद्ध करतो की, हातकणंगले नगर पंचायत थेट अध्यक्ष पोटनिवडणूक कार्यक्रम-२०२४ अंतर्गत खालील उमेदवार हातकणंगले नगर पंचायत थेट अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करीत आहे.

### अनुसूची

| अ. क्र. | निवडून आलेल्या अध्यक्षाचे नाव | शेरा (जागा आरक्षण) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | जानवेकर अर्चना अरुण | अनुसूचित जाती |

**अमोल येडगे**,
जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

कोल्हापूर, २३ ऑगस्ट २०२४.

---

## ORDER

क्रमांक कार्या. ११/न.पा./सं.क. ७/पोटनिवडणूक/एसआर-२०/२०२४.– In exercise of the powers conferred on me by the State Election Commissioner, Maharashtra State, Mumbai *vide* his Order No. SEC/NP-2022/CR-6/ Desk. 6, dated 12th July 2024 and the provisions contained in the sub-Section *(1)* of Section 19 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchyats and Industrial Townships Act, 1965. I, Amol Yedge, Collector, Kolhapur, hereby publish the name of the Candidate who have been declared President of Hatkanangale Nagar Panchayat in the Direct Presidential By-Election Program-2024.

### Schedule

| Sr. No. | Name of President | Remarks (Ward Reservation) |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1. | Janvekar Archana Arun | Scheduled Caste |

**AMOL YEDGE,**
Collector, Kolhapur.

Kolhapur, 23rd August 2024.

---

## मुख्याधिकारी यांजकडून

### भोर नगर परिषद, भोर

*भोर नगर परिषद हद्दीतील अनाधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी "पदनिर्देशित अधिकारी" नियुक्ती आदेश*

### आदेश

क्रमांक प्रशासन/भोर न.प./९०३/२०२४.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, दिनांक १३ मार्च २०१२ मध्ये प्रसिद्ध केल्यानुसार सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५५ आणि ५६ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी व अनधिकृत बांधकामावर प्रभावी नियंत्रण आणणेसाठी मुख्याधिकारी यांनी नगर परिषदेच्या बाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२ *(३)* नुसार संबंधित अधिकाऱ्यास त्याच कार्यक्षेत्राकरिता "पदनिर्देशित अधिकारी" म्हणून अधिसूचित करणेची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२ *(३)* मधील तरतुदींनुसार नगर परिषद मुख्याधिकारी म्हणून मला प्राप्त झालेल्या अधिकारात मी, भोर नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रासाठी भोर नगर परिषदेत कार्यरत असलेले कर्मचाऱ्यांची खालील नमूद तक्त्यातील तपशिलाप्रमाणे अनधिकृत बांधकांमावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी व अधिनियमातील कलम ५५ व ५६ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी "पदनिर्देशित अधिकारी" म्हणून घोषित करीत आहे.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | कर्मचारी/सेवकांची नावे | हुद्दा | सोपविण्यात आलेले कार्यक्षेत्र (२०१८ च्या निवडणूक रचनेप्रमाणे प्रभाग क्रमांक) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री. राजेंद्र सुदाम राऊत | लिपिक | ०१, ०३ |
| २. | श्री. महेंद्र राजाराम बांदल | लिपिक | ०२, ०४ |
| ३. | श्री. जगदिश ज्ञानदेव लोखंडे | लिपिक | ०५, ०६ |
| ४. | श्री. महादेव खंडू बोडके | मुकादम | ०७, ०८ |

वेळोवेळी मुख्याधिकारी यांनी निर्गमित केलेल्या विवक्षित आदेशामध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्रासाठी उपरोक्त १ ते ४ अधिकारी/कर्मचारी यांचे नियुक्तीच्या कालावधीत या अधिसूचनेनुसार "पदनिर्देशित अधिकारी" समजण्यात येईल.

ठाणे महानगरपालिका हद्दीत शिळाफाटा येथे अनधिकृत बांधकाम केलेली ७ मजली इमारत ढासळून अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले असून अशा घटना इतर ठिकाणी होऊन नयेत याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने अशी अनधिकृत विकास/बांधकामे व त्यावर करावयाची कार्यवाही खाली विशद केल्याप्रमाणे आहे.

१. आतापर्यंत प्राप्त झालेल्या सर्व अनधिकृत विकास / बांधकामाविषयक तक्रारीची स्थळ पाहणी करून पंचनामा करणे व नोटिस देऊन पुढील नियमोचित तक्रार दाखल करणे.

२. भोर नगर परिषद हद्दीमध्ये अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण, अनधिकृत फेरीवाले इत्यादी नागरी गुन्हे घडू नयेत या दृष्टीने उपरोक्त बिट निरीक्षक/पदनिर्देशित अधिकारी यांनी नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रामध्ये गस्त घालून संदर्भीय शासन निर्णयानुसार कारवाई करण्याचे काम करायचे आहे.

३. घेतलेल्या बांधकाम परवानगीशी सुसंगत नसलेले किंवा परवानगी देताना घातलेल्या अटींचा भंग करून केलेली विकास कामे अथवा बांधकामासंदर्भात उचित कार्यवाही करणे.

४. मंजूर FSI निर्देशांकापेक्षा जादा केलेला विकास/बांधकामासंदर्भात अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई प्रस्तावित करणे.

५. परवानगीचा कालावधी संपल्यानंतर केलेल्या विकास/बांधकामासंदर्भात अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई प्रस्तावित करणे.

६. परवानगीच्या विरोधात जाऊन केलेले विकास कामे जसे जमिनीच्या वापरात विनापरवानगी बदल इत्यादींबाबत अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई प्रस्तावित करणे.

उक्त बांधकामांना अनधिकृत विकास/बांधकाम समजण्यात यावे व त्यावर पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१) विकास/बांधकाम यांची स्थळ पाहणी करून पंचनामा करणे.

(२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये योग्य त्या कलमाखाली नोटिस देणे व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४, ५५ आणि ५६ नुसार व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक अधिनियमाचे कलम १८९ पोटकलम ८, ९, १०, ११, १२ आणि १३ नुसार अनधिकृत बांधकामावर कारवाई करणे.

(३) कोणत्याही इमारतीचे उभारणीचे काम, विकास अथवा बांधकाम उक्त अधिनियमाच्या किंवा उपविधीच्या तरतुदींचा भंग करीत असल्याचे "पदनिर्देशित अधिकाऱ्यांचे" निदर्शनास आणून दिले असेल अथवा त्याचे निदर्शनास आलेले असेल आणि जर असा "पदनिर्देशित अधिकारी" पुरेशा कारणाशिवाय, नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५२, ५३, ५४, ५५ किंवा ५६ व इतर आवश्यक त्या तरतुदींप्रमाणे कार्यवाही करणेस कसूर करीत असेल तर त्याचेवर नियमानुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. याशिवाय अधिकारी/कर्मचारी यांचे निष्काळजीपणामुळे काही अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या कर्मचारी/अधिकारी यांचेवर निश्चित करण्यात येईल.

७. वरील नियुक्त अधिकारी/सेवक यांनी वरील कार्यवाही करणेपूर्वी रचना सहायक/सहायक नगर रचनाकार यांचे मार्गदर्शन घेऊनच कार्यवाही करावयाची असून रचना सहायक/सहायक नगर रचनाकार यांनी सर्व नियुक्ती "पदनिर्देशित अधिकारी" यांचा मासिक अहवाल संकलित करून घेऊन मुख्याधिकारी यांचेकडे सादर करावयाचा आहे.

**श्रीराम भगवान पवार,**
मुख्याधिकारी,
भोर नगर परिषद, भोर.

भोर, १९ ऑगस्ट २०२४.

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.